मा. महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका.
ठराव क्र. :-१/ 368
दिनांक :- 23/10/2020

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका,पुणे-५.
जा.क्र.:- मआ/साप्रवि/आस्था/4932
दिनांक :- 23/10/2020

-: आज्ञापत्र :-

विषय :- अभियांत्रिकी संवर्गातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) वर्ग - १ या पदावर तदर्थ पदोन्नतीने नेमणूक देणेबाबत.

संदर्भ :- १) मा. मुख्य सभा ठराव क्र. ९७८, दि.१८/०२/२०२०.
२) आज्ञापत्र जा. क्र. मआ/साप्रवि/आस्था/९१६०, दि.०३/०३/२०२०.
३) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र.१/ 368 दि. 23/10/2020

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील उप अभियंता (स्थापत्य) वर्ग - २ या पदावरुन कार्यकारी अभियंता (स्थापत्य) वर्ग - १ (वेतन श्रेणी १५६००-३९१०० + ग्रेड पे ६६०० + मान्य भत्ते) या पदावर तदर्थ पदोन्नतीने नेमणुक करणेबाबत संदर्भ क्र. १ व ३ चे मान्यतेस अनुसरून खालील सेवकाची या आज्ञापत्राच्या दिनांकापासून पदोन्नतीने तदर्थ (Ad-hoc) नेमणूक करण्यात येत आहे.

| अ. क्र. | सेवकाचे नाव व गट | तदर्थ पदोन्नतीचा प्रवर्ग | सध्याचे खाते | बढतीचे खाते | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.बर्वे मुकूंद चिंतामण, (खुला) | खुला | मालमत्ता व व्यवस्थापन विभाग | घनकचरा व्यवस्थापन विभाग | शेड्यूलमान्य रिक्त जागी |

१) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या विरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. याबाबत विधी व न्याय विभागाने दि.२८/१२/२०१७ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार तूर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवाज्येष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते, दिनांक २५/०५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी अशा सूचना सा.प्र.वि./का.१६-ब ने दि.२९/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिल्या आहेत.

तसेच, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे पत्र क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.४६७ A/१६-ब, दि.११/१०/२०१८ चे पत्रान्वये, सद्यस्थितीत पदोन्नतीच्या कोट्यातील बिंदूनामावली तपासून शासन पत्र दि.२९/१२/२०१७ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचानानुसार, केवळ खुल्या प्रवर्गातील पदे शासनाचे पुढील आदेश होईपर्यत भरणे अपेक्षित आहे, असे कळविले आहे.

त्यानुसार सदर अधिकाऱ्यांची कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावरील तदर्थ पदोन्नती मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अधिन

असून पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात देण्यात येत आहे. तसेच खालील अटीच्या अधिन राहून सदर पदोन्नती देण्यात येत आहे :-

अ) सदर अधिकाऱ्यांविरुध्द आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही.

ब) या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित अधिका-यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

क) मागास प्रवर्गातील अधिकाऱ्यांची पदोन्नती सदर अधिकाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबधित जात पडताळणी समितीने निर्गमित केले आहे या अटीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

२) वरील नियुक्त्या मे. राज्य शासनाच्यावतीने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका डायरी क्र. ३३१५१/२०१७ वर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येत आहेत.

३) वरील अधिकारी यांचे पदोन्नती संदर्भात जात, शैक्षणिक पात्रता, जन्मदिनांक इत्यादी बाबत सादर केलेली माहिती केव्हाही असत्य असल्याचे आढळून आल्यास त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता पदावनत करण्यात येईल.

४) वरील अधिका-यांनी आज्ञापत्र हाच कार्यमुक्ती आदेश समजून संबंधित खात्यात त्वरीत रुजू व्हावे व निवेदन आमचेकडे सादर करावे.

५) वरील अधिकारी यांनी आज्ञापत्राच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत पदोन्नतीचे खात्यात रुजू व्हावे. सदर मुदतीत रुजू न झालेस सदरची पदोन्नती आपोआप रद्द होईल.

६) उपरोक्त अधिकारी यांना महानगरपालिका सेवाविनियम व वेळोवेळी शासन पारित करतील ते शासन निर्णय लागू होतील.

७) संबंधित सेवकास मनपा सेवाविनियमानुसार वेतन व अन्य भत्ते आदा करणेत यावेत.

८) या आज्ञापत्रकाची नोंद उपरोक्त सेवकांच्या सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजवीज करावी.

(विक्रम कुमार)
**महापालिका आयुक्त**
पुणे महानगरपालिका

प्रत : संबंधित (सर्व)
पुणे महानगरपालिका.
यांजकडे माहिती व पुढील तजविजीसाठी रवाना...